# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२४/प्र.क्र.१७/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: -१०/०९/२०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-सातारा

मौजे- क्षेत्र महाबळेश्वर, जि. सातारा, सर्व्हे क्रमांक ५१ अ, गट क्र ७७/1 येथील ३३ केव्ही x ११ केव्ही उपकेंद्र आणि इतर सुविधांचे नियमितीकरण करण्याकरीता ०.३७१६ हे. वनजमिन वळतीकरणाबाबत..

संदर्भ:- १) केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डी-१७/एफसीए-एस१/पीआयडी-१५६०८०/ कोल्हापूर/२६३८, दि.०७.१२.२०२३.

२) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १६.०१.२०२४ चे पत्र.

३) केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डी-१७/एफसीए-एस१/पीआयडी-१५६०८०/ कोल्हापूर/६७, दि.१२.०४.२०२४.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय क्र. १ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्यांबाबत माहिती सादर करण्याबाबत संदर्भ क्र. २ च्या शासन पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरून संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये शासनास माहिती सादर केली आहे. सदर माहिती स्वयंस्पष्ट नसल्याने खालील तक्त्यामधील स्तंभ क्र. ४ मधील बाबींच्या अनुषंगाने आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास सादर करावा.

| अ.क्र. | शासनाने उपस्थित केलेले मुद्दे | क्षेत्रीय वन अधिकारी यांच्याकडून अहवाल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | जिल्हाधिकारी, सातारा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सातारा यांना मौजे- क्षेत्र महाबळेश्वर, जि. सातारा येथे सर्व्हे क्रमांक ५१ अ, गट क्र ७७/१ येथील ०.३७१६ हे. जमीन उपलब्ध करुन दिलेल्या दिनांक १६.०४.१९७४ च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. | प्रकरणी प्रकल्प यंत्रणेने त्यांचेकडील दिनांक १६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडील दिनांक १६.०४.१९७४ रोजीचे आदेशाची छायांकीत प्रत मागणी केली होती, परंतु सदर आदेशाची प्रत जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यलयात आढळून येत नसलेबाबत त्यांच्याकडील दिनांक २०.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये | जिल्हाधिकारी यांचे जमिन हस्तांतरणाचे आदेश जर दिनांक १६.०४.१९७४ चे असतील तर, त्या आधीच्या विभागीय वन अधिकारी यांच्या दि.१०.०१.१९७३ च्या पत्रामध्ये जिल्हाधिकारी यांच्या दि.१६.०४.१९७४ च्या पत्रामधील निर्णयाचा संदर्भ कसा येईल, हा प्रश्न आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कळविण्यात आले आहे. (प्रपत्र -१)<br>तथापि तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ च्या पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे. | त्यामुळे सदरचे स्पष्टीकरण सुसंगत नाही. |
| २ | जिल्हाधिकारी यांनी उपकेंद्रासाठी उपलब्ध करुन दिलेली जमीन रेकॉर्डवर उपलब्ध कागदपत्रांवरून लीजची मुदत १९९९ मध्ये संपली असल्याचे नमूद केले आहे. तथापि, लीज बाबतची कोणतीही कागदपत्रे दिसून येत नाहीत. सदरची कागदपत्रे सादर करावीत. | याबाबत प्रकल्प यंत्रणेकडील संदर्भीय पत्रात नमुद केले प्रमाणे त्यांचे कार्यालयात तसेच उपवनसंरक्षक सातारा कार्यालयातील संबंधीत प्रकरणाच्या अभिलेखामध्ये तपासणी केली असता सदर लीज बाबतची कागदपत्रे मिळुन येत नाहीत.<br>तथापि, तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ चे पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे. | |
| ३ | उपकेंद्राचे बांधकाम सन १९८० पूर्वी केले असल्याचे कोणतेही कागदपत्र जसे की, बांधकामास प्रशासकीय मान्यता आदेश, बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. उपलब्ध नाही. त्यामुळे उक्त बांधकाम दिनांक २५.१०.१९८० पूर्वी झाले किंवा कसे हे निश्चित कळत नाही. याबाबत कागदपत्रे सादर करावीत. | तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ चे पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे.<br>तसेच प्रकल्प यंत्रणेकडील दिनांक १३.०५.२०२४ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावित वनजमिनीचे संबंधीत कामाचे "Const. of C.R. structural foundation for cable trenches, land development, retaining wall and harber wire fencing at Mahabaleshwar, Dist. Satara" दि. ०८.११.१९७९ रोजीच्या बांधकामाचे कार्यादेशाची छायांकित प्रत सादर | सदर प्रकल्पाचे बांधकाम करण्यास कंत्राटदाराला दि. ०८.११.१९७९ रोजी दिल्याचे पत्र सादर केले आहे. यावरून सदर प्रकल्पाचे बांधकाम दिनांक २५.१०.१९८० पूर्वी झाले किंवा कसे, हे स्पष्ट होत नाही. त्याचप्रमाणे कार्यादेशामध्ये विशेषत: land development या सदरच्या बांधकामामध्ये नेमक्या कोणकोणत्या बाबींचा समावेश आहे. याबाबत स्पष्टता होत नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केली आहे. तथापि, यावरून सदर प्रकल्पाचे बांधकाम करण्यास कंत्राटदाराला परवानगी दि. ०८.११.१९७९ च्या पत्रान्वये दिलेली असली तरी सदर बांधकाम दिनांक २५.१०.१९८० पूर्वी झाले किंवा कसे, हे स्पष्ट होत नाही. | |
| ४ | उपवनसंरक्षक, यांनी वनभंग अहवालामध्ये वनविभागासाठी आवश्यकता असेल तेव्हा प्राधान्याने २ सूट आरक्षित ठेवावे, असे नमूद केल आहे. यावरुन प्रस्तावित क्षेत्रामध्ये विश्रामगृह आहे किंवा कसे, असल्यास ते स्थळ विवक्षित आहे का, याबाबतची माहिती सादर करावी. | प्रकरणी सदरच्या क्षेत्रामध्ये विश्रामगृह नसुन ते कर्मचारी वसाहत व पाहणी कक्ष आहेत. प्रकरणी यामधील दोन कक्ष वेळोवेळी उपलब्ध करुन देणेबाबत नमुद केले आहेत. या प्रस्तावित क्षेत्रात विश्रामगृह नाहीत. | सदर प्रकल्पामध्ये विश्रामगृह नसून कर्मचारी वसाहत व पाहणी कक्ष स्थळ विवक्षित आहे. मात्र, कर्मचारी वसाहत व पाहणी कक्ष वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० नुसार स्थळ विवक्षित आहे किंवा कसे, याबाबत अभिप्राय अप्राप्त आहेत. |
| ५ | प्रकल्प यंत्रणेने Judicial Court Wai, Satara येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरण कशासाठी दाखल करण्यात आले आहे, त्याबाबतची सद्य:स्थितीदर्शक माहिती सादर करावी | प्रस्तावित ग.नं. ५२ अ मधील वनक्षेत्रात Judicial Court Wai, Satara येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरणी देवस्थान ट्रस्ट यांनी देवस्थान ट्रस्ट विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर असा दावा वाई येथील न्यायालयात विषयांकीत प्रस्तावित वनजमीन ग.नं. ५२-अ ही देवस्थान ट्रस्टची असल्याबाबत दावा दाखल केला आहे. | प्रस्तावित क्षेत्राच्या मालकी हक्काबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे उचित होईल का, यासंदर्भात अभिप्राय अप्राप्त आहेत. |

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर
२. उप वनसंरक्षक, सातारा
३. अति. कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., सातारा.